RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ७२

दि.०८ जुलै २०२६, वार : बुधवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## आरटीओतील कथित गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी; दोषींवर कठोर कारवाई केली जाईल : मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) विभागातील कथित गैरव्यवहार, कर चुकवेगिरी आणि अनियमिततांच्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

सदस्य विजय वडेट्टीवार यांनी या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. त्यास उत्तर देताना ते बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, यासंदर्भात परिवहन मंत्र्यांशी चर्चा केली असून, सभागृहातील सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांची गंभीर दखल घेण्यात आली आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या विषयावरील चर्चेला उत्तर देताना यासंदर्भातील सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, महागड्या लक्झरी वाहनांच्या नोंदणीसंदर्भात काही प्रकरणांमध्ये कर चुकवेगिरी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. काही वाहनमालक महाराष्ट्रात वास्तव्यास असून राज्यातील बँकांकडून कर्ज घेत असतानाही वाहनांची नोंदणी मात्र दादरा-नगर हवेली, दमण-दीव, पुदुच्चेरी आदी ठिकाणी केल्याची उदाहरणे समोर आली आहेत. अशा प्रकारांवर आरटीओकडून कारवाई सुरू आहे. भविष्यात कर चुकवेगिरी रोखण्यासाठी जीएसटी पडताळणी तसेच कर्ज व रहिवासाशी संबंधित कागदपत्रांची काटेकोर तपासणी करण्यात येईल. आरटीओ विभागासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारी, ध्वनिचित्रफिती आणि अन्य आरोपांची स्वतंत्र चौकशी करण्यासाठी वरिष्ठ आयपीएस अधिकारी प्रियंका नारनवरे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले आहे. या त्रिसदस्यीय समितीत अतिरिक्त परिवहन आयुक्त रवी गायकवाड आणि दक्षता अधिकारी मंदार जावळे यांचा समावेश आहे. या समितीला एका महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

## जळगाव जामोद येथील बेपत्ता महिलेच्या प्रकरणाची विभागीय चौकशी तीन महिन्यांत पूर्ण करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### चुकीचा तपास करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचे निलंबन, निष्कासनाचीही प्रक्रिया करू

**मुंबई/प्रतिनिधी:** जळगाव जामोद येथील बेपत्ता महिलेच्या प्रकरणात पोलिसांनी अत्यंत गंभीर स्वरूपाची चूक केली आहे. या प्रकरणातील संबंधित पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर नियमानुसार ठोस कारवाई करण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

विधानसभेत सदस्य रोहित पवार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संबंधित महिला बेपत्ता असल्याची तक्रार दाखल होती. त्यानंतर एक मृतदेह सापडल्यानंतर तो याच महिलेचाच असल्याचा निष्कर्ष पोलिसांनी घाईघाईने काढला. कोणताही अंतिम निष्कर्ष किंवा वैज्ञानिक पडताळणी न करता तपास पूर्ण झाल्याचे दाखविण्यात आले. एवढेच नव्हे, तर त्या महिलेच्या आई-वडिलांनाच तिच्या खुनाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. मात्र, त्यानंतर संबंधित महिला जिवंत असल्याचे समोर आले आणि ती स्वतः पोलीस ठाण्यात हजर झाली. त्यामुळे पोलिसांना तिच्या आई-वडिलांची सुटका करावी लागली. दरम्यान, सापडलेल्या मृतदेहाचा स्वतंत्र तपास सुरू असून तो पूर्ण करण्यात येत आहे.

या संपूर्ण प्रकरणात पोलिसांचे वर्तन अत्यंत चुकीचे असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे संबंधित गुन्हे शाखेतील सर्व पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक तसेच या प्रकरणाशी संबंधित सर्व अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हेही दाखल करण्यात येणार आहेत. निलंबन ही केवळ प्राथमिक कारवाई असून, ज्यांचा या प्रकरणाशी थेट संबंध असल्याचे सिद्ध होईल, अशा अधिकाऱ्यांवर विहित प्रक्रिया पूर्ण करून सेवेतून निष्कासनाची कारवाईही करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

राज्य शासनाने विकसित केलेल्या नवीन कृत्रिम बुद्धिमत्ता () तंत्रज्ञानाच्या मदतीने राज्यातील सुमारे १,६०० ते १,७०० बेपत्ता व्यक्तींच्या प्रकरणांचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्यातून सात मृतदेहांची ओळख पटविण्यात यश आले आहे. या प्रकरणाचाही तपास त्याच तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सुरू आहे. या प्रकरणामुळे अन्याय सहन करावा लागलेल्या पीडित कुटुंबाला राज्य सरकारतर्फे आर्थिक मदत देण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रकरणाची विभागीय चौकशी तीन महिन्यांत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# वाहनचालक परवान्यासाठी १ ऑगस्टपासून महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य-परिवहन मंत्री सरनाईक

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्यात वाहनचालक परवाना मिळविण्यासाठी १ ऑगस्ट २०२६ पासून नवीन नियमावली लागू करण्यात येणार असून त्यानुसार महाराष्ट्र अधिवास (डोमिसाइल) प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सदस्य दिलीप लांडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री सरनाईक बोलत होते. या चर्चेत सदस्य सुनील प्रभू यांच्या सह अन्य सदस्यांनी सहभाग घेतला.

मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, ड्रायव्हिंग परवाना नवीन नियमावलीचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला असून मंजुरीनंतर त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.



त्याचबरोबर राज्यात सुरू असलेल्या अनधिकृत बाईक टॅक्सी सेवांवर दंडात्मक कारवाई सुरू आहे. या क्षेत्राचे नियमन करून राज्याला महसूल मिळावा आणि तरुण-तरुणींना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने शासन नियोजन करत आहे.

या नव्या व्यवस्थेनुसार बाईक टॅक्सी चालकांकडून दररोज पाच रुपये महसूल जमा करण्यात येणार आहे. प्रत्येक राईडमागे दोन रुपये कल्याण निधीसाठी जमा करणे बंधनकारक करण्याचा प्रस्ताव आहे; तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे किंवा चुकीच्या पद्धतीने वाहन चालविणाऱ्यांवर परिवहन विभागाकडून कठोर दंडात्मक कारवाई केली जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र बाईक टॅक्सी नियमांमध्ये महिला, विद्यार्थी आणि अल्पवयीन प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. बाईक टॅक्सी चालकाकडे मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ३ नुसार वैध वाहनचालक परवाना; तसेच महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ४ नुसार सार्वजनिक सेवा वाहन चालविण्याचे अधिकारपत्र (बॅज) असणे बंधनकारक करण्यात आले आहे. हा बॅज देण्यापूर्वी अर्जदाराची पोलीस विभागामार्फत चारित्र्य पडताळणी करण्याचीही तरतूद करण्यात आली आहे.

महाराष्ट्र बाईक टॅक्सी नियम, २०२५ नुसार अर्जदाराने खाजगी दुचाकी वाहनांद्वारे प्रवासी वाहतूक करता कामा नये; तसेच उर्वरित सर्व अटींची पूर्तता एका महिन्याच्या आत करण्याच्या अटीवर राज्य परिवहन प्राधिकरणाने उबेर इंडिया सिस्टीम्स प्रा. लि., रोपेन ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस प्रा. लि. (रॅपिडो) आणि ॲनी टेक्नॉलॉजीज प्रा. लि. (ओला) या ॲग्रीगेटर कंपन्यांना मुंबई महानगर क्षेत्रासाठी ३० दिवसांचा तात्पुरता परवाना देण्यास मान्यता दिली होती.

अनधिकृत बाईक टॅक्सी सेवा रोखण्यासाठी परिवहन विभागाने आणखी कठोर भूमिका घेतली आहे; तसेच राज्यातील प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या वायुवेग पथकांकडून परवान्याशिवाय बाईक टॅक्सी सेवा चालविणाऱ्या वाहनचालकांवर सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत ८१४ दोषी वाहने आढळून आली. त्यापैकी १५१ वाहने जप्त करण्यात आली असून १४ गुन्हे (एफआयआर) दाखल करण्यात आले. या कारवाईत १६.२५ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तर एप्रिल २०२६ ते मे २०२६ या दोन महिन्यांत २११ दोषी वाहनांवर कारवाई करण्यात आली. त्यापैकी ६६ वाहने जप्त करण्यात आली आणि २.३१ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

राज्यात बाईक टॅक्सी सेवा कायदेशीर चौकटीत आणून प्रवाशांची सुरक्षितता, चालकांचे नियमन, महसूल वाढ आणि युवकांना रोजगार या चारही बाबी साध्य करण्यासाठी शासन सर्वंकष धोरण राबवत असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

## सहाय्यक आयुक्तांच्या नविन आदेशाने हजारो कामगारांचे नोंदणी रद्द होऊ नये म्हणून लातूर शहर पूर्व भाग कृती समितीचे निवेदन

**लातूर/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील बांधकाम कामगारांची नूतनीकरण / नवीन नोंदणी बांधकाम कामगार पोर्टलवर डिसेंबर २०२६ पर्यंत पडताळणी प्रलंबित असताना नूतन सहाय्यक आयुक्तांच्या नविन आदेशाने हाजारो कामगरांचे नोंदणी रद्द होणार असल्याने सबंदीत आदेश मागे घेण्यासाठी लातूर शहर पूर्व भाग कृती समितीचे निवेदन सहाय्यक कामगार आयुक्तांना सकारात्मक चर्चा करून निवेदन देण्यात आले

निवेदनात लातूर जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या नोंदणी बांधकाम कामगार पोर्टलवर डिसेंबर २०२६ पर्यंत हजारो अर्ज पडतळी करिता प्रलंबित असून सादर अर्जात तत्कालीन सह्यक आयुक्त श्री मंगेश झोले यांच्या निर्देशानुसार बांधकाम कामगारांनी आवश्यक पुरावे गोळा करून अर्ज दाखल करण्यात आले आहेत या अर्जाची पडताळी डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण होणार असताना नुकतेच बदलीवर नव्याने आलेले सह्यक कामगार आयुक्त मोहसीन शेख यांनी बांधकाम कामगार नोंदणी अर्ज पडताळणी करून मंजूर करतांना पती /पत्नी चे विविध ओळखपत्रे सक्तीने सादर करण्याच्या सूचना दिल्याने बांधकाम कामगार अधिकृत ऑनलाईन सेंटरवर गेल्यास सदरील पुरावे नव्याने मागत असल्याने पुन्हा नव्याने पुरावे सादर करावे लागत असल्याने पुर्वी वैयक्तीक अर्जदाराचे नाव टाकून मुलाला वारस करता येत होते व त्याप्रमाने आर्ज दाखल केले आहेत

आता नविन सहाय्यक आयुक्तांच्या नियमात कम्पलसरी पतीचे पन नाव टाकावे अन्यथा पडताळणी होणार नाही असा आदेश काढला आहे जो की



पुर्वी हा आदेश नव्हता आपल्या आदेशाच्या नंतर बांधकाम मजुर अर्जदाराला हा नियम चालू करावा व पूर्वी अर्ज दाखल केलेल्या बांधकाम कामगारांची होणारी हेळसांड होत असुन जिल्ह्यातील हजारो बांधकाम कामगारांचे अर्ज रद्द होणार असल्याने नवीन सह्यक कामगार आयुक्तांचा नवीन आदेश आजच्या दिनांक पासून लागू करण्याची मागणी करण्यात आली

निवेदनावर लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे,सचिव बाबासाहेब बनसोडे,गौतम ससाणे,भगवेश्वरधनगर,दिगंबर कसबे इत्यादीच्या स्वाक्षऱ्या होत्या

## सर्व शासकीय, खासगी आस्थापनांनी ३१ जुलैपर्यंत मनुष्यबळाचे त्रैमासिक विवरणपत्र सादर करावे



**लातूर/प्रतिनिधी:** सर्व शासकीय आणि खासगी आस्थापनांनी कार्यरत मनुष्यबळाची माहिती दर्शविणारे त्रैमासिक विवरणपत्र (ईआर-१) प्रत्येक तिमाही संपल्यानंतर ३० दिवसांच्या आत ऑनलाइन सादर करणे बंधनकारक आहे. सेवायोजन कार्यालये रिक्तपदे सक्तीने अधिसूचित करणारा अधिनियम, १९५९ आणि त्याअंतर्गत नियमावली, १९६० नुसार, सर्व आस्थापनांनी हे विवरणपत्र तातडीने सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

केंद्र आणि राज्य शासन, अंगीकृत उद्योग, व्यवसाय, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगरपालिका तसेच खासगी क्षेत्रातील सर्व आस्थापनांना ईआर-१ विवरणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. या विवरणपत्रासाठी आस्थापनांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर नियोक्ता लॉगइनद्वारे प्रवेश करावा. यासाठी एम्प्लॉयर (लिस्ट अ जॉब) पर्यायावर क्लिक करून, युजर आयडी आणि पासवर्ड वापरून लॉगइन करावे. त्यानंतर डॅशबोर्डवरील ईआर-१ पर्याय निवडून एंटर ईआर-१ वर क्लिक करावे. यानुसार, त्रैमासिक विवरणपत्र ३१ जुलै २०२६ पूर्वी ऑनलाईन सादर करावे, असे आवाहन सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी केले आहे. विवरणपत्र सादर करताना तांत्रिक अडचणी उद्भवल्यास ०२३८२-२९९४६२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही त्यांनी कळविले आहे.

# राक्षसांनीही मंदिराची दानपेटी लुटली नाही, ते नीच काम संघ-भाजपवाल्यांनी केले - जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांचा घणाघात

**लातूर/प्रतिनिधी:** अयोध्येतील प्रभू श्रीरामचंद्रांच्या मंदिरासाठी देशभरातील भाविकांकडून गोळा करण्यात आलेल्या देणग्यांमध्ये झालेल्या कथित भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ आज लातूर काँग्रेसच्या वतीने रघुपती राघव राजाराम सत्याग्रह करण्यात आला. गंजगोलाई येथील श्री जगदंबा मातेच्या महाआरतीने या आंदोलनाची सुरुवात झाली. याप्रसंगी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके यांनी देणगी प्रकरणातील घोटाळ्याचा पाढा वाचत संघ आणि भाजपवर अत्यंत शेलक्या शब्दांत आणि तीव्र संताप व्यक्त करत घणाघाती टीका केली.



रावण, दुर्योधनापेक्षाही दुष्ट प्रवृत्ती माध्यमांशी सविस्तर संवाद साधताना जिल्हाध्यक्ष अभय साळुंके म्हणाले की, ''या देशात पापातील पापी आणि दुष्टातील दुष्ट प्रवृत्ती होऊन गेल्या. रावण झाला, दुर्योधन झाला, परंतु या राक्षसांपैकी सुद्धा कोणी अशा प्रकारे श्रद्धेवर घाला घातला नाही. त्यांनीही कधी मंदिराच्या दानपेटीवर डल्ला मारला नव्हता. ते दानपेटी लुटण्याचं नीच काम या संघ आणि भाजपवाल्यांनी केले आहे.'' अठरापगड जाती-धर्माच्या आणि सर्वसामान्य, प्रामाणिक माणसांनी आपल्या घामाचा पैसा अयोध्येत राम मंदिर उभे राहावे म्हणून विश्वासाने दिला होता.

मात्र, या दरोडेखोरांनी त्यांच्या विश्वासाचा आणि श्रद्धेचा बाजार मांडला आहे, असा उद्वेग साळुंके यांनी व्यक्त केला.

### मुख्य कोषाध्यक्ष मोकाट, चिल्लर लोक बळीचा बकरा

या प्रकरणातील खऱ्या गुन्हेगारांना पाठीशी घातले जात असल्याचा आरोप करत साळुंके म्हणाले की, ''हजारो कोटींच्या या लुटीत मुख्य कोषाध्यक्ष आणि जबाबदार लोकांची नावे अद्यापही समोर आलेली नाहीत. सरकार आणि पोलिसांकडून खऱ्या गुन्हेगारांना वाचवून केवळ काही चिल्लर लोकांना बळीचा बकरा बनवून जेलमध्ये डांबण्यात आले आहे. सत्य बाहेर येऊ नये म्हणून त्यांच्यापर्यंत मीडियालाही जाऊ दिले जात नाही.'' सरकारने न्यायाच्या भूमिकेतून या प्रकरणाचा सखोल आणि खरा तपास करावा, अशी मागणी त्यांनी या वेळी केली.

### सुप्रीम कोर्टाच्या देखरेखीखाली चौकशीची मागणी

यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा. शिवाजी जवळगेकर यांनीही विश्वस्त मंडळींवर जोरदार प्रहार केला. राम मंदिरातील दान चोरीचा हा अपहार अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने झाला असून ट्रस्टचे विश्वस्त याबद्दल अनभिज्ञ कसे असू शकतात, असा प्रश्न विचारत या संपूर्ण अपहाराची चौकशी सुप्रीम कोर्टाच्या देखरेखीखाली व्हावी, अशी आक्रमक मागणी प्रा. जवळगेकर यांनी केली.

### सद्बुद्धी मिळण्यासाठी रामधून आणि लुटारूंना इशारा

श्रद्धेचा बाजार मांडणाऱ्या आणि पापाचे वाटेकरी असलेल्या या प्रवृत्तींना आता तरी सुधरण्याची सद्बुद्धी मिळावी, यासाठी आई जगदंबेची आरती केल्यानंतर काँग्रेस कार्यकर्त्यांनी महात्मा गांधीजींचे रघुपती राघव राजाराम हे भजन गाऊन प्रार्थना केली. तसेच, ''यापुढे अशा लुटारूंनी देणगी मागितली, तर सर्वसामान्य माणूस आपल्या खिशाकडे हात नेणार नाही,'' असा स्पष्ट इशाराही साळुंके यांनी दिला.

यावेळी विलास सहकारी बँकेचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव, प्रदेश काँग्रेसचे सचिव डॉ. दिनेश नवगिरे, भालचंद्र सोनकांबळे, विष्णुदास धायगुडे, ॲड. देविदास बोरुळे पाटील,मोईन सय्यद, प्रा. प्रवीण कांबळे, प्रवीण सूर्यवंशी,असिफ बागवान,राम स्वामी, ॲड. शरद देशमुख,मारुती पांडे, सचिन केंद्रे, पटेल,रईस टाके, धोंडीराम यादव,सतीश साळुंके,अभिषेक पतंगे, बालाजी झिपरे, राहुल देशमुख,सागर मुसंडे, अभिषेक देशमुख,भालचंद्र येडवे,भाऊसाहेब भडीकर ॲड. गणेश कांबळे,जफर पटवेकर, आसिफ मणियार,सोनू डगवाले, पवनकुमार कुमार गायकवाड, ॲड. अंगदराव गायकवाड, अक्षय मुरुळे,नारायण कांबळे, लक्ष्मण मदने, श्री दिवेकर, व्यकट सरवदे, पांडुरंग देडे आबू मणियार,संजय बिराजदार,नागनाथ डोंगरे,प्रमोद लोखंडे करीम तांबोळी यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि लातूरचे सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सर्वांनी एकमुखाने या अपहार प्रकरणाचा आणि श्रद्धेशी खेळणाऱ्या प्रवृत्तींचा जाहीर निषेध नोंदवला

## संपादकीय...

## नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत अनेक प्रश्न पुन्हा ऐरणीवर आले आहेत.

मुंबईत दरवर्षी पावसाळा सुरू होताच पाणी तुंबणे, वाहतूक विस्कळीत होणे, दुर्घटना आणि जीवितहानी अशीच परिस्थिती निर्माण होते. यंदाही मुसळधार पावसानंतर नागरी नियोजन, पायाभूत सुविधा, प्रशासनाची तयारी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत अनेक प्रश्न पुन्हा ऐरणीवर आले आहेत. येरे घना येरे घना... अशी पावसाची आळवणी महाराष्ट्रात सुरू होते आणि तो पाऊस आल्यानंतर 'नको नको रे पावसा, धिंगाणा अवेळी' अशी परिस्थिती केवळ दोन दिवसांत येते, ती येथील बेफिकीर व्यवस्थेमुळे. यावर्षी पाऊस लांबला. तो आला तेव्हा लगेचच असा धुवाँधार आला की, त्यात जनजीवन तर विस्कळीत झालेच आहे. म्हणजे कित्येक वर्षे बेलगामपणे वागणाऱ्या यंत्रणा या पावसात उघड्या पडल्या आहेत. मुंबईसारख्या जागतिक कीर्तीच्या महानगरात नेमेची येणाऱ्या पावसात पहिल्या दोन दिवसांत दहा मानवी मृत्यू होतात हे वास्तव भयानक शोकात्मक आहे. नियोजनाबद्दल काही महत्त्वाची पावले उचलली जातात काय, या प्रश्र्नाचे उत्तर आता महाराष्ट्राला हवे आहे. सर्वप्रथम प्रश्र्न मुंबईचा. शंभर मिलिमीटरच्या वर पाऊस झाला की, मुंबई ठप्प पडते हे आत्तापर्यंतचे सर्व विदित सत्य. कोणाचेही सरकार आले तरी मुंबईची बेटावर आधारित रचना बदलली जाऊ शकत नाही. भौगोलिक परिस्थितीचे हे आव्हान मोठे. त्याबरोबरच दुसरे आव्हान यंत्रणेचे. संकटमोचनासाठी यंत्रणा किती तयार आहेत याचा विचार होतो का? यंत्रणा काही करत नाही असा नागरिकांचा समज होतो. अस्मानी आपत्तीत सुलतानी आपत्ती भर घालते. मुंबईसारखी अवाढव्य महानगरी वाहती राहते याचे कारण येथील व्यवस्था आहे. भारताला 'फंक्शनिंग अनारकी' असे म्हटले जाते. मुंबईबाबत ते संपूर्णतः सत्य आहे. या महानगराचे सर्व व्यवहार यंत्रणा काहीतरी काम करत असतात म्हणूनच सुरू असतात. अर्थात आपण महानगर चालवतो याची जाणीव असल्यामुळे अधिकारी मंडळीतील काही मूठभर लोक कायदे हातात घेतात, ते वाकवतात, त्यासाठी काही 'भेटी' स्वीकारतात आणि शहराची संपूर्ण व्यवस्था बदनाम करतात. खरे तर ज्या शहरात रोजीरोटीसाठी हजारोंचे लोंढे येतात, जागा मिळेल तिथे राहतात, तेथे मुळातच आयुष्याची किंमत कितीशी असणार? दहा बाय बाराच्या खोलीत राहून आपल्या कामाकडे जाणे, पैसे कमावणे आणि ते गावी पाठवून कधीतरी तेथे आपल्या माणसांत परत जाण्याची वाट पाहात राहणे हे मुंबई शहराच्या नागरिकांचे प्राक्तन आहे. इथे येणारे बहुतेक लोक उपरे आहेत. काही परप्रांतातले तर काही महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातले. ते या महानगराच्या श्रीमंतीमागचे खरे हात. मात्र हे सगळे बाहेरून आलेले असल्यामुळे त्यांच्या भल्याचा विचार कुणीही करत नाही. मिळेल तिथे जागा शोधून झोपडपट्टीदादांनी बांधलेल्या झोपडीत ते राहतात. धोकादायक दरडीवरदेखील लोक राहतात. अशा मंडळींना काही नैसर्गिक आपत्ती आली की, पावसाच्या रौद्र रूपासमोर मान टेकवावी लागते. आयुष्य संपते. पावसाळ्यात हे कायमच घडत राहते. मानखुर्द परिसरात झोपडी पडून झालेला एका कुटुंबाचा मृत्यू हा असाच दुर्दैवी प्रकार आहे. वारंवार नोटीस पाठवूनही नागरिक ती घरे रिकामी करत नाहीत, असे प्रशासन म्हणते. पण मुळात त्यांनी जायचे कुठे, पर्यायी व्यवस्था काय आणि शहर सोडून बाहेर गेलो तर पोटाला अन्न कसे मिळणार, असे अनेक प्रश्र्न या साखळीचा भाग असतात. मुंबई ही सुंदरी. मायावी नगरी. तिचे अत्यंत वाईट रूप पावसात पाहावे लागते. ठिकठिकाणी पाणी साचते. घाण पाणी शहराच्या रस्त्यांवर सुखेनैव विहार करते. साचलेला चिखल आणि शहरात आलेला गाळ ही पुढे समस्या होते. त्यातून रोगराई पसरते. नालेसफाईचे दावे खोटे पडतात. मुळात जनतेला आपण किती कचरा करावा याचे भान नाही. त्या कचऱ्याची विल्हेवाट हा संपूर्ण भारतातला महत्त्वाचा मुद्दा. पावसाळ्यात मुंबईत हा सगळा प्रकार अत्यंत विद्रूप चेहरा घेऊन समोर येतो आणि मग 'मुंबईची तुंबई झाली'सारखे आरोप-प्रत्यारोप समोर येतात. हे आरोप-प्रत्यारोप आणि त्यातून बाहेर पडणे हा प्रशासन आणि सरकारसमोरचा खूप मोठा आव्हानात्मक भाग आहे. कित्येक वर्षांनंतर शिवसेना उबाठाचे सरकार पायउतार झाले आहे आणि त्या जागी भाजपची सत्ता आली आहे. जनतेने सत्तापरिवर्तनासाठी मत दिले ते आयुष्यात काही बदल व्हावा या हेतूने. तसे जर होत नसेल तर कोणतेही सत्तापरिवर्तन 'राव गेले आणि पंत चढले'एवढेच मर्यादित राहील. इथे महिला महापौर असल्यामुळे 'माई गेल्या आणि ताई आल्या', असे मर्यादित होईल. मुंबईत अपघाती मृत्यू नकोत, पावसाळी बदनामी नको असे अभियान राबवायचे असेल तर त्यात सत्ता पक्षाने विरोधकांनाही सामावून घेतले तर बरे पडेल. अनास्था आणि अनागोंदीचा जो भाग आहे तो दूर करायचा असेल तर एक सर्वपक्षीय प्रतिबद्धता लागते. ती अजूनही मुंबईत कुठेही दिसलेली नाही. ती या महानगराची गरज आहे. पावसाचे पाणी वाहून गेल्यानंतर ही मुंबई बदलण्याची ईर्ष्या पुन्हा कुठेतरी दडी मारून बसायला नको. या वेळेच्या पावसात महत्त्वाचा प्रश्र्न निर्माण झाला तो मुंबई आणि पुणे यांना जोडणाऱ्या कनेक्टिंग लिंकचा. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने अत्यंत मेहनतीने हा मार्ग उभारला. तिथे कोणत्याही दुर्घटना घडू नयेत यासाठी सरकारने उद्घाटनांची तारीख वेळोवेळी लांबवली. आता हा रस्ता जनतेच्या सेवेत आल्यामुळे मुंबई-पुणे दोन्ही मार्गांवरचा सुमारे अर्धा ते पाऊण तासाचा वेळ वाचला. मात्र आज तेथील स्लॅब कोसळला अशा अफवा घटना म्हणून चर्चेत आल्या. भारतातल्या भ्रष्टाचाराची व्याप्ती लक्षात घेता येथे काहीही घडू शकते, असे जनतेला वाटते. कोणत्याही महत्त्वाच्या बांधकामाकडेही आता त्याच नजरेतून बघितले जाते. पारदर्शकता निर्माण होण्यासाठी संशयाने एखाद्या गोष्टीकडे बघितले जाण्यास काहीही हरकत नाही. जिथे राम मंदिरातील दानातच चोरी होते, तेथे प्रत्येक गोष्टीकडे संशयाच्या बघावेसे वाटणे हे अपरिहार्य. सोमवारी आठवड्याला प्रारंभ होताना सकाळी सकाळी कनेक्टिंग लिंकचा स्लॅब कोसळला, असा अपप्रचार मोठ्या प्रमाणात सुरू झाला. प्रत्यक्षात कनेक्टिंग लिंकच्या प्रवेशद्वाराजवळ जो मातीचा दरवाजा उभारला गेला होता तो कोसळला. असा दरवाजा कोसळायला नको हे खरे. पण मुळातच मार्ग लक्षात घ्यावा यासाठी बांधलेले ते मातीचे बांधकाम होते. दरड कोसळल्यामुळे दगडांच्या भाराने ते वाहून गेले. समाजमाध्यमांवर मिसिंग लिंकचे छत कोसळले असा अपप्रचार झाल्यामुळे जे काय वादळ निर्माण झाले ते अत्यंत दुर्दैवी होते. दरडप्रवण भागात कनेकटिंग लिंक बांधली गेली, त्याचे सोहळे झाले. या लिंकबाबत काहीही वावगे घडणार नाही याकडे लक्ष दयायला हवे. झाडें पडून, खड्ड्यात बुडून निष्पापांचे प्राण जातात तेंव्हा सरकारची जबाबदारी अधिकच वाढते हे लक्षात घेतलेले बरे.

# राज्यातील १३८ जलदगती न्यायालयांसाठी न्यायाधीशांच्या उपलब्धतेसाठी उच्च न्यायालयाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू : मुख्यमंत्री फडणवीस




**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात मंजूर करण्यात आलेल्या १३८ जलद गती न्यायालयांपैकी सध्या केवळ ५८ न्यायालये कार्यरत असून उर्वरित न्यायालयांसाठी न्यायाधीश उपलब्ध करून देण्याबाबत शासनाकडून उच्च न्यायालयाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य डॉ. राहुल कुल यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात एकूण १३८ जलद गती न्यायालये सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, न्यायाधीशांची नियुक्ती ही पूर्णपणे न्यायव्यवस्थेच्या अखत्यारीतील बाब असल्याने सध्या केवळ ५८ न्यायालये कार्यरत होऊ शकली आहेत. गेल्या वर्षभरापासून मुख्यमंत्री म्हणून माझ्या आणि मुख्य न्यायाधीश यांच्या संयुक्त बैठकीत तसेच पत्रव्यवहाराद्वारे मंजूर न्यायालयांसाठी न्यायाधीश उपलब्ध करून देण्याची विनंती सातत्याने करण्यात येत आहे.

उच्च न्यायालयाने नवीन न्यायाधीशांची भरती आणि पदोन्नती प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याची माहिती दिली आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्व मंजूर जलद गती न्यायालयांना न्यायाधीश उपलब्ध करून दिले जातील. तोपर्यंत काही न्यायालयांना संबंधित प्रकरणांसाठी 'डिझिग्नेटेड' दर्जा देण्यात आला आहे. मात्र, त्यांना इतर खटल्यांचीही सुनावणी करावी लागते, असेही त्यांनी सांगितले.

पुण्यासह राज्यातील न्यायालयीन पायाभूत सुविधांबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, गेल्या दहा-बारा वर्षांत महाराष्ट्रात सत्र न्यायालये आणि अतिरिक्त जिल्हा न्यायालयांचा मोठ्या प्रमाणात विस्तार करण्यात आला आहे. न्यायालयीन पायाभूत सुविधा उभारण्यासाठी शासन आवश्यक निधी आणि सुविधा उपलब्ध करून देत आहे.

खटल्यांच्या संख्येच्या आधारे अतिरिक्त न्यायालयांची आवश्यकता उच्च न्यायालयाच्या समितीकडून निश्चित केली जाते. पुणे व इतर ठिकाणी अतिरिक्त न्यायालयांची मागणी प्राप्त झाल्यास ती खटल्यांच्या संख्येनुसार पडताळून आवश्यकतेनुसार नवीन न्यायालये मंजूर करण्यात येतील.

यासंदर्भात अधिकचे निर्देश देत विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी कनिष्ठ न्यायव्यवस्थेतील मोठ्या प्रमाणावरील रिक्त पदांमुळे न्यायदान प्रक्रियेला विलंब होत असल्याकडे लक्ष वेधले. विशेषतः पुण्यातील मकोका न्यायालयासह विविध न्यायालयांमध्ये अनेक फौजदारी खटले वर्षानुवर्षे प्रलंबित राहिल्याने सामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. न्यायाधीशांची रिक्त पदे तातडीने भरावीत आणि मुख्य न्यायाधीशांशी समन्वय साधून ही प्रक्रिया गतीमान करावी, असेही निर्देश अध्यक्षांनी दिले.

यावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, पुढील मुख्य न्यायाधीशांच्या बैठकीच्या अजेंड्यावर हा विषय प्राधान्याने समाविष्ट करण्यात येईल. राज्यातील ज्या ठिकाणी न्यायाधीशांची कमतरता आहे किंवा नव्या नियुक्त्यांची आवश्यकता आहे, त्या सर्व बाबी उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देऊन भरती प्रक्रिया अधिक वेगाने पूर्ण करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# लातूरमध्ये दिव्यांग उमेदवारांसाठी विशेष रोजगार मेळावा यशस्वी




**लातूर :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, लातूर मॉडेल करिअर सेंटर आणि संवेदना दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हरंगुळ (बु.) यांच्या संयुक्त विद्यमाने ०४ जुलै २०२६ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय दिव्यांगासाठी विशेष रोजगार मेळाव्याचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यातील दिव्यांग उमेदवारांना विविध क्षेत्रात नव्याने निर्माण होत असलेल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता. या विशेष रोजगार मेळाव्याचे ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन करताना कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे माननीय मंत्री श्री. मंगल प्रभात लोढा यांनी उपस्थित दिव्यांगांना मार्गदर्शन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या मेळाव्यात साईबाबा जनता सहकारी बँक लि. लातूर, सुजया एंटरप्राइजेस (जया ह्युन्दाई) लातूर, राजयोग ॲटो प्रा.लि. लातूर, राजयोग मोटर्स लातूर, राजर्षी फाऊंडेशन लातूर, जबिल सर्कीट इंडिया प्रा.लि. पुणे, वेलांगी कनेक्टीव्हीटी छत्रपती संभाजीनगर, आर.डी.एस. ऑनलाईन सर्व्हसेस लातूर, बंजारा आर्ट अँन्ड गारमेंट लातूर, श्री गणेशा प्रेस ॲन्ड गाटे छत्रपती संभाजी नगर, महिंद्रा इंडोमोबिल लातूर आणि मराठवाडा ॲटो क्लस्टर छत्रपती संभाजीनगर यांसारख्या एकूण १२ नामांकित कंपन्यांच्या उद्योजकांनी उपस्थित राहून प्रत्यक्ष मुलाखतींद्वारे उमेदवारांची निवड केली. या मेळाव्यास एकूण १६५ नोकरी इच्छुक दिव्यांग उमेदवारांनी हजेरी लावून प्रत्यक्ष मुलाखती दिल्या, ज्यामधून ३८ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली असून १९ उमेदवारांची अंतिम निवड झाली आहे.

याशिवाय, नोकरीऐवजी स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यास इच्छुक असलेल्या ३० उमेदवारांनी स्वयंरोजगारासाठी आपली इच्छा दर्शविली असून, त्यांना महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामउद्योग मंडळ, अण्णासाहेब पाटील विकास महामंडळ, दिव्यांग वित्त व विकास महामंडळ, महात्मा फु ले मागासवर्ग विकास महामंडळ आणि ओबिसी महामंडळ या विविध शासकीय महामंडळांच्या स्वयंरोजगार योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली व त्यानुसार त्यांना लाभ मिळवून देण्याचे नियोजन केले जात आहे.

या प्रसंगी कौशल्य विकासचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकात, दिव्यांग उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगार संधी उपलब्ध करून देऊन त्यांना सन्मानाने आयुष्य जगता यावे यासाठी समाजाने एकत्रित प्रयत्न करण्याचे प्रतिपादन केले. या मेळाव्याला कौशल्य विकास उपआयुक्त श्रीमती विद्या शितोळे, व्यवसाय शिक्षण सहसंचालक प्रदीप दुर्गे, संवेदना प्रकल्पाचे समन्वयक सुरेश पाटील, जिल्हा व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण अधिकारी प्रवीण औताडे आणि लातूर आयटीआयचे प्राचार्य संजय माळकुंजे आदी उपस्थित होते. हा विशेष रोजगार मेळावा यशस्वी करण्यासाठी कौशल्य विकास अधिकारी गिरीष महामुनी, डॉ. रोहित पवार, संवेदना प्रकल्पाचे समन्वयक व्यंकट लामजाने, विठ्ठल गाडेकर तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र लातूर कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### गरिबीच्या झळा सोसून

माणुसकीचा ध्यास घेतला,
पैशाचा मार्ग नाकारून
केवळ सेवेचा धर्म स्वीकारला.
नावाप्रमाणेच मेघराज तुम्ही
गरिबांवर मायेची सावली धरता,
संकट कितीही मोठे आले तरी
मी आहे ना! म्हणत धीर देता.
ना पैशाची हाव धरली
ना कसला अहंकार केला,
सरकारी रुग्णालयात राहून
गरिबांचा आधार झाला.
मोठ्या पदावर असूनही
राहिले सदा सर्वसाधारण,
गर्वाचा लवलेशही नाही
असे त्यांचे थोर मोठेपण.
शस्त्रक्रियेच्या खोलीमध्ये
तुमचा हात देव बनून धावतो,
अनेकांच्या संकटात
तो नवा जन्म देऊन जातो.
सर्जरी डिपार्टमेंटचे एचओडी तुम्ही
पण मनात मात्र साधेपणा,
तुमच्या या प्रामाणिकपणाला
सलाम करतो प्रत्येक जण.
डॉक्टर्स डे च्या निमित्ताने
डॉ. मेघराज चावडा सरांना मान वंदना देतो,
तुम्ही आहात देवाचे रूप
हाच विश्वास मनी बाळगतो.

**शुभेच्छुक:**
**संतोष मांदळे**

# एसआयआर : मतदानाच्या अधिकाराला अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न

मतदानाचा दिवस उजाडतो. उत्साहाने एक नागरिक मतदान केंद्रावर पोहोचतो. रांगेत उभा राहतो. त्याची वेळ येते. मात्र मतदार यादी तपासल्यानंतर त्याला सांगितले जाते आपले नाव यादीत नाही. काही क्षणांसाठी तो स्तब्ध होतो. मतदानाचा अधिकार असतानाही तो त्या दिवशी तो वापरू शकत नाही. त्या क्षणी त्याला जाणवते की लोकशाहीतील सर्वात मोठा अधिकार केवळ मतदानाच्या दिवशी मिळत नाही; तो त्याही आधी मतदार यादीत आपल्या नावाच्या अचूक नोंदीपासून सुरू होतो.

ही जाणीव प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचावी, यासाठी भारत निवडणूक आयोगा मार्फत वेळोवेळी यादी अद्यावत करण्यात येते. त्याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणजे विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर). ही प्रक्रिया केवळ प्रशासकीय उपक्रम नाही; ती प्रत्येक पात्र नागरिकाच्या घटनात्मक मतदानाच्या अधिकाराला अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न आहे.

**मतदार यादी म्हणजे लोकशाहीचा पाया**

घराचा मजबूत पाया दिसत नाही, पण संपूर्ण घर त्यावर उभे असते. मतदार यादीचेही तसेच आहे. मतदान केंद्रावरील मतपेटी, निवडणुकीची प्रक्रिया किंवा निकाल यापूर्वी एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची असतेमतदार यादीची अचूकता.

मतदार यादी ही केवळ नावांची यादी नसते. ती देशातील प्रत्येक पात्र नागरिकाच्या समान अधिकाराची अधिकृत नोंद असते. या यादीत नाव अचूक असणे म्हणजे मतदानाचा अधिकार सुरक्षित असणे. नाव, पत्ता किंवा इतर माहिती योग्य असल्यामुळे भविष्यातील मतदानाच्या दिवशी कोणताही अडथळा निर्माण होत नाही. त्यामुळे मतदार यादीतील प्रत्येक नोंद ही लोकशाहीवरील विश्वास अधिक दृढ करणारी ठरते.

**एसआयआर का आवश्यक आहे?**

दरवर्षी नियमित पुनरीक्षणाची प्रक्रिया होत असते. त्यामध्ये नवीन मतदारांची नोंद, माहितीतील बदल किंवा दुरुस्ती केली जाते. मात्र काही वेळा अधिक व्यापक आणि सखोल पडताळणीची आवश्यकता निर्माण होते. अशा वेळी ए स आ य आ र राबविण्यात येते.

या विशेष पुनरीक्षणाचा उद्देश प्रत्येक पात्र मतदाराची नोंद शक्य तितकी अचूक, अद्ययावत आणि विश्वासार्ह ठेवणे हा असतो. कालांतराने स्थलांतर, पत्त्यातील बदल, नव्याने पात्र झालेले मतदार किंवा इतर कारणांमुळे माहितीमध्ये बदल होऊ शकतात. एसआयआर या सर्व बाबींकडे अधिक बारकाईने पाहते. त्यामुळे मतदार यादी अधिक सक्षम, पारदर्शक आणि वास्तवाशी सुसंगत बनते.

ही प्रक्रिया भविष्यातील निवडणुकांमध्ये प्रत्येक पात्र नागरिकाचा सहभाग अधिक सहज आणि निर्विघ्न व्हावा, यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते.

**घरभेट देणारा अधिकारी विश्वास जपणारा दुवा**

या प्रक्रियेदरम्यान बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) किंवा निवडणूक कर्मचारी नागरिकांच्या भेटी घेतात. अनेकदा ही भेट केवळ कागदपत्रांची पडताळणी वाटू शकते. पण प्रत्यक्षात ती त्यापेक्षा कितीतरी मोठी असते.

घराच्या दाराशी आलेला बीएलओ हा केवळ माहिती नोंदवणारा अधिकारी नसतो; तो प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार सुरक्षित राहावा, यासाठी काम करणारा महत्त्वाचा दुवा




असतो. त्याच्या नोंदींमुळे मतदार यादी अधिक अचूक बनते आणि भविष्यात मतदानाच्या दिवशी कोणालाही अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी आवश्यक तयारी पूर्ण होते.

ही प्रक्रिया नागरिक आणि निवडणूक व्यवस्थापन यांच्यातील विश्वास अधिक दृढ करते. कारण लोकशाही मजबूत होण्यासाठी प्रशासन आणि नागरिक यांचा परस्पर संवाद तितकाच आवश्यक असतो.

**ही प्रक्रिया प्रशासनासाठी नव्हे प्रत्येक मतदारासाठी आहे**

लोकशाहीमध्ये प्रत्येक मत समान मूल्य घेऊन येते. समाजातील प्रत्येक व्यक्तीचा आवाज त्यातून व्यक्त होतो. त्यामुळे मतदार यादीतील स्वतःची माहिती अचूक राहणे म्हणजे आपल्या त्या आवाजाची खात्री करून घेणे होय.

एसआयआर ही कोणत्याही एका विभागासाठी किंवा कार्यालयीन कामकाजासाठी राबवली जाणारी प्रक्रिया नाही. तिचा सर्वाधिक लाभ नागरिकालाच मिळतो. कारण योग्य आणि अद्ययावत मतदार यादी म्हणजे भविष्यात मतदानाच्या दिवशी आत्मविश्वासाने मतदान करता येण्याची खात्री.

या प्रक्रियेत सहभागी होणे म्हणजे केवळ एक औपचारिकता पूर्ण करणे नव्हे; तर स्वतःच्या घटनात्मक अधिकाराचे जतन करण्यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवणे होय. लोकशाहीतील आपली उपस्थिती नोंदविण्याची ही एक महत्त्वाची संधी आहे.

**उद्याच्या मतदानाचा विश्वास आजच्या सहभागातून**

लोकशाही ही केवळ निवडणुकीच्या दिवशी जिवंत होत नाही. ती प्रत्येक वेळी बळकट होते, जेव्हा प्रत्येक पात्र नागरिकाचा अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक प्रक्रिया मनापासून पूर्ण केली जाते.

एसआयआर ही अशीच एक विश्वास निर्माण करणारी प्रक्रिया आहे. आज काही मिनिटे देऊन केलेली माहितीची पडताळणी उद्या मतदानाच्या दिवशी निश्चिंतपणे मतदान करण्याचा आत्मविश्वास देते. त्यामुळे ही प्रक्रिया केवळ नोंदी अद्ययावत करण्यापुरती मर्यादित राहत नाही; ती नागरिक आणि लोकशाही यांच्यातील विश्वास अधिक दृढ करणारा पूल बनते.

प्रत्येक मत महत्त्वाचे असते, कारण त्यामागे एका नागरिकाची ओळख, त्याचा अधिकार आणि देशाच्या लोकशाहीवरील विश्वास दडलेला असतो. म्हणूनच एसआयआर ही ''कोणासाठी तरी'' नसून आपल्या प्रत्येकासाठी आहे. या प्रक्रियेत सहभागी होणे म्हणजे आपल्या मतदानाच्या अधिकाराला अधिक सुरक्षित, सक्षम आणि भविष्यासाठी निश्चित करण्याचा सकारात्मक निर्णय. आणि म्हणूनच, ही प्रक्रिया माझ्यासाठी आहे आणि त्यात सहभागी होणे हे माझ्या लोकशाही प्रवासाचे स्वाभाविक पाऊल आहे.

महाराष्ट्रात भारत निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत एसआयआर अंतर्गत घरभेटींद्वारे गणना प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या काळात बूथ लेव्हल अधिकारी प्रत्येक घराला भेट देऊन गणना फॉर्म उपलब्ध करून देतात, आवश्यक माहिती व कागदपत्रांची पडताळणी करतात आणि मतदार यादीतील नोंदी अद्ययावत करण्यासाठी माहिती संकलित करतात. त्यानंतर प्राप्त माहितीची छाननी, दावे व हरकतींची प्रक्रिया पूर्ण करून ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेचा उद्देश प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार अचूक, सुरक्षित आणि निर्विघ्न राहावा, हा आहे.

**– सचिन अडसूळ,**
जिल्हा माहिती अधिकारी,
कोल्हापूर

# लाईनमनला जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी सरपंचा विरुद्ध गुन्हा दाखल; केज तालुक्यातील घटना

**केज/प्रतिनिधी :** महावितरण कंपनीच्या लाईनमनला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी सरपंचा विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, आदिनाथ श्रीधर मुंडे वय ३७ वर्षे व्यवसाय नोकरी वरिष्ठ टेक्निशियन (लाईनमन) महावितरण शाखा ग्रामीण-२ केज,रा.भोपला ता.परळी जि.बीड,ह.मु. येळवे यांचा वाडा, उमरी रोड केज, आदिनाथ मुंडे हे केज येथील शाखा ग्रामीण-२ मध्ये वरिष्ठ टेक्निशियन (लाईनमन) या पदावर सन २०१९ पासून शाखा ग्रामीण येथे महावितरण कंपनीमध्ये कार्यरत आहेत. आदिनाथ मुंडे यांच्याकडे महावितरण शाखा ग्रामीण-२ अंतर्गत केज तालुक्यातील कोरेगाव सह इतर आठ गावे मुख्यालय म्हणून विद्युत पुरवठा देखभाल व दुरुस्तीचे कामाची जबाबदारी दिलेली आहे. दिनांक ६ जुलै २०२६ रोजी सकाळी ८ ते ८-३० वाजण्याच्या सुमारास लाईनमन आदिनाथ मुंडे हे केज तालुक्यातील उमरी या गावात असताना त्यांना त्यांच्या मो. नं.९५२७३१४२४१ या क्रमांकावर केज तालुक्यातील कोरेगाव येथील सरपंच दत्तू किसन नागरगोजे यांच्या मो. नं.९५४५९४२२२२ या क्रमांकावरून फोन आला व सरपंच दत्तू नागरगोजे हे लाईनमन मुंडे यांना म्हणाले की, कोरेगाव येथील ग्राहक रामचंद्र सोनाजी तांदळे यांची लाईट बंद आहे. ती दुरुस्त करून द्या असे म्हणाले असता त्यावर लाईनमन मुंडे हे सरपंच नागरगोजे यांना म्हणाले की, दुपारपर्यंत दुरुस्त करून देतो.परंतु लाईनमन आदिनाथ मुंडे यांचे उमरी येथील लाईन ओढण्याचे काम हे दुपारी ३-०० वाजेपर्यंत चालले व तेथून लाईनमन मुंडे हे परत येत असताना डोणगाव फाट्यावर आल्यानंतर पावसाचे वातावरण निर्माण होऊन पाऊस सुरू झाला. पाऊस थांबल्यानंतर लाईन मुंडे हे त्यांच्या घरी गेले असता सायंकाळी ७-०० वाजण्याच्या सुमारास परत कोरेगाव चे सरपंच दत्तू किसन नागरगोजे यांनी लाईनमन आदिनाथ श्रीधर मुंडे यांना फोन करून म्हणाले की, तुम्हाला मी सकाळी काम सांगितले ते तुम्ही केले नाही. असे म्हणून लाईनमन मुंडे यांना तुम्ही इकडे गावात यायचे नाही. असे म्हणून मुंडे यांना सरपंच नागरगोजे यांनी शिवीगाळ केली. लाईनमन आदिनाथ मुंडे हे सरपंच दत्तू नागरगोजे यांना म्हणाले की, उद्या काम करून देतो. असे मुंडे म्हणाले तरी सरपंच नागरगोजे यांनी मुंडे यांना पुन्हा पुन्हा शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या, त्यानंतर रात्री ९-०० वाजता मो. नं.९३२२५१५३०० या नंबर वरून परत लाईनमन आदिनाथ मुंडे यांना फोन करून तु कोठे आहेस तुझी बघतो. असे म्हणून सरपंच नागरगोजे यांनी लाईनमन मुंडे यांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली व तू कसे काम करतोस तेच बघतो असे म्हणून लाईनमन मुंडे हे त्यांचे सार्वजनिक काम करीत असताना त्यांना आटकाव केला. अशा आशयाची फिर्याद लाईनमन आदिनाथ श्रीधर मुंडे यांनी केज पोलीस ठाणे येथे येऊन सरपंच दत्तू किसन नागरगोजे रा.कोरेगाव ता.केज यांच्या विरुद्ध फिर्याद दिली असुन सरपंच यांचे विरुद्ध गु.र.नं.४२४/२०२६ भारतीय न्याय संहिता (बी एन एस),२०२३ कलम २२१,३५१(२),३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील गुन्ह्याचा पुढील तपास हा पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कानिस्टेबल फुलचंद सानप हे करत आहेत.




## नाशिकमधील ढगफुटीचा धोका टळला; संततधार पावसामुळे वाढली गोदावरी नदीच्या पाण्याची पातळी

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक शहरावरील ढगफुटीचं संकट टळलं आहे. त्र्यंबकेश्वर-नाशिक मार्गे जाण्याची शक्यता असलेला भोवरा आता उत्तर दिशेला सुरतकडे आणि दक्षिण दिशेला अकोले (अहिल्यानगर) परिसराकडे सरकला आहे. त्यामुळे तूर्तास नाशिककरांना दिलासा मिळाला आहे. सोमवारी रात्रीपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे गोदावरी नदीच्या पाण्याची पातळी वाढली आहे.भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार नाशिक त्र्यंबकेश्वर परिसरात ७ जुलै रोजी ढगफुटीची शक्यता वर्तवण्यात आली होती. यानुसार प्रशासनानं सतर्क राहून तातडीनं उपाययोजना करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हा प्रशासनाला दिले होते. त्यानुसार नाशिक जिल्हा प्रशासनाच्या वतीनं सतर्क म्हणून नाशिक जिल्ह्यातील शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली होती.

# पालवनधाम दिंडीचे भक्तिमय प्रस्थान

## विठ्ठलनामाच्या गजरात शेकडो वारकरी देहूकडे रवाना

**केज/प्रतिनिधी :** औरंगपूर (ता. केज, जि. बीड) : आषाढी वारी २०२६ निमित्त श्री जगद्गुरू तुकोबाराय पावनधाम, औरंगपूर येथून पालवनधाम दिंडीचे रविवारी रोजी भक्तिमय वातावरणात उत्साहात प्रस्थान झाले. विठ्ठलनामाच्या अखंड गजरात आणि टाळ-मृदंगाच्या निनादात शेकडो वारकरी श्री क्षेत्र देहूकडे मार्गस्थ झाले.

दिंडी प्रस्थानापूर्वी संत तुकाराम महाराज यांच्या मूर्तीचा दुग्धाभिषेक ह.भ.प. महंत महादेव महाराज बोराडे (शास्त्री) यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर हरिनाम भजन, कीर्तन व सामूहिक नामस्मरणाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. 'ज्ञानोबा-तुकोबा' आणि 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल' या जयघोषाने पावनधाम परिसर दुमदुमून गेला.

या दिंडीत औरंगपूरसह बनसारोळा, आवसगाव, कौडगाव, जवळबन, दाभा, कळंबआंबा, लाडेगाव, जयपूर, दिपेवडगाव, सोनवळा, कुंभेफळ, बोरीसावरगाव, होळ, सोमनाथ बोरगाव, चनई, सुरडी, सोनेसांगवी, आवाड, शिरपूरा, अंकोली, सौंदना (आंबा), सौंदना (केज), सावळेश्वर, मोटेगाव, गोटेगाव, इस्थळ, वाकडी, सुकळी, गांजी, चंदनसावरगाव, भावठाणा, बुधोडा, पिंपरीआंबा, गाधवड, वांजरखेडा, फावडेवाडी, पैठण (सा.), तांदळवाडी, गगनबीड, वळगा, वाघोली, लोखंडी सावरगाव, माळेगाव आदी गावांतील वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

वारकऱ्यांसाठी वाहन व्यवस्था, भोजन, पिण्याचे स्वच्छ पाणी, वैद्यकीय सेवा तसेच इतर आवश्यक सुविधांची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. संपूर्ण सोहळा शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. ह.भ.प.महंत महादेव महाराज बोराडे (शास्त्री) यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेली ही दिंडी श्रीक्षेत्र देहू येथे संतश्रेष्ठ तुकोबारायांच्या पालखी सोहळ्यात सहभागी होणार असून, त्यानंतर श्रीक्षेत्र पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी प्रस्थान करणार आहे. भक्ती, सेवा, समता आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणाऱ्या या दिंडी सोहळ्याबद्दल वारकरी व भाविकांमध्ये मोठा उत्साह दिसून आला.




# पीक विम्यासाठी संभाजी ब्रिगेडचे महसूल मंडळ पाटोदा येथे बेमुदत साखळी उपोषण सुरू

**पाटोदा/प्रतिनिधी :** ७ जुलै सन २०२५ च्या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.

शासनाने नुकसानभरपाई दिली असली तरी शेतकऱ्यांना अद्याप पीक विम्याची रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केल्याप्रमाणे कोणत्याही अटी-शर्ती न लावता प्रति हेक्टर १७,५०० रुपये पीक विमा मंजूर करून संपूर्ण बीड जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना तातडीने वितरित करावा, या प्रमुख मागणीसाठी संभाजी ब्रिगेड, अंबाजोगाई यांच्या वतीने महसूल मंडळ पाटोदा येथे बेमुदत साखळी उपोषणास आजपासून सुरुवात करण्यात आली.

संभाजी ब्रिगेडने दिलेल्या निवेदनात, ई-पीक पाहणीतील त्रुटी, पीक विमा मंजुरीतील विलंब, शासनाने जाहीर केलेल्या मदतीची तात्काळ अंमलबजावणी तसेच शेतकऱ्यांना न्याय मिळावा या मागण्या करण्यात आल्या आहेत. या मागण्या मान्य न झाल्यास ९ ऑगस्टपासून मुंबई आझाद मैदान येथे आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. यावेळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या खोडसे, तालुकाध्यक्ष संभाजी घोरपडे, जिल्हा सचिव नारायण मुळे मामा यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

उपोषणस्थळी बोलताना पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, शासनाने जाहीर केलेला प्रति हेक्टर १७,५०० रुपयांचा पीक विमा कोणत्याही अटी-शर्तीशिवाय तातडीने वितरित करावा. अन्यथा संभाजी ब्रिगेडचा हा लढा अधिक तीव्र करून संपूर्ण महाराष्ट्रभर आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी सुरू करण्यात आलेल्या या आंदोलनाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.




# कोकणातील कातळशिल्पांचे संरक्षण आणि संवर्धन केले जाणार- मंत्री ॲड. आशिष शेलार

मुंबई, दि. ७ : कोकणातील कातळशिल्पांचा माहितीपट आणि डिजिटल दस्तऐवजीकरणाचे काम शक्य तितक्या कमी कालावधीत पूर्ण करण्यात येईल. विविध ऋतूंमध्ये, वेगवेगळ्या देशांमधून आणि ठिकाणांहून छायाचित्रण व ध्वनिचित्रण करून सर्वसमावेशक नोंदी तयार करण्यात येणार असून हे काम २०२९ पूर्वीच पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न राहील, अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

कोकणातील कातळशिल्पांसंदर्भात विधानसभा सदस्य विठ्ठल लंघे यांनी प्रश्न विचारला होता. यावर मंत्री शेलार यांनी उत्तरात ही माहिती दिली. सदस्य भास्कर जाधव, शेखर निकम, विक्रम पाचपुते, नाना पटोले यांनीही यावेळी उपप्रश्न विचारले.

मंत्री शेलार म्हणाले की, कातळशिल्पांचे संरक्षण ही राज्य शासनाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. कोकणात कोणताही विकास प्रकल्प राबविताना पुरातत्त्व विभाग आणि भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण () यांची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय कातळशिल्प असलेल्या परिसरात कोणतेही काम होऊ दिले जाणार नाही. कातळशिल्पांचे नुकसान होणार नाही, याबाबत शासन कटिबद्ध आहे.

राज्यातील नऊ कातळशिल्प स्थळांचा समावेश युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. त्याबाबतचा प्राथमिक अहवालही प्राप्त झाला आहे. जागतिक वारसा दर्जा मिळाल्यानंतर त्या स्थळांच्या विकासासाठी निश्चित निकष लागू होतात. त्यामुळे या कातळशिल्पांचे संरक्षण आणि संवर्धन अधिक प्रभावीपणे करता येईल, असेही त्यांनी सांगितले.



दरवर्षी दोन लाखांहून अधिक पर्यटक या कातळशिल्प स्थळांना भेट देत असल्याने त्यांच्या सोयीसाठी १७ महत्त्वाच्या स्थळांवर संरक्षण भिंती, पोहोच मार्ग, दिशादर्शक फलक, माहिती केंद्रे आणि स्वच्छतागृहे उभारण्याची कामे सुरू करण्यात आली आहेत; तसेच सर्व कातळशिल्पांसाठी मार्गदर्शकांसह सर्वंकष साइट मॅनेजमेंट प्लॅन तयार करण्यात येणार असल्याचेही मंत्री शेलार यांनी सांगितले.

खाजगी मालकीच्या जागांवरील कातळशिल्पांच्या संरक्षणासाठी स्थानिक जमीनमालकांना सहभागी करून घेणारी योजना तयार करण्यात येणार आहे. पर्यटनातून मिळणाऱ्या उत्पन्नात त्यांचाही सहभाग सुनिश्चित करण्याचा शासनाचा मानस आहे. कातळशिल्पांना कोणतीही हानी न पोहोचविता संबंधित भागातील विकास प्रकल्पांबाबत योग्य निर्णय घेतला जाईल आणि कातळशिल्पांचे संरक्षण कोणत्याही परिस्थितीत सुनिश्चित केले जाईल, अशी ग्वाही मंत्री आशिष शेलार यांनी आपल्या उत्तरात दिली.

## नवी मुंबईत थरारक घटना! सुसाट कारने 10 लोकांना चिरडलं, कारचालक फरार

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईतील तळोजा परिसरातून अपघाताची एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. तळोजा सेक्टर १० मध्ये एका अनियंत्रित कारने रस्त्यावरील ८ ते १० जणांना भीषण धडक दिली. या काळजाचा थरकाप उडवणाऱ्या अपघातात २ जणांचा जागीच मृत्यू झाला असून, ८ जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, तळोजा सेक्टर १० परिसरातून जात असताना अचानक कार चालकाचं गाडीवरील नियंत्रण सुटलं. नियंत्रण सुटलेली ही सुसाट कार रस्त्यावरून जाणाऱ्या आणि बाजूला उभ्या असलेल्या लोकांच्या अंगावर गेली. वेग जास्त असल्याने कारने तब्बल ८ ते १० जणांना पाला पाचोळ्याप्रमाणे हवेत उडवलं. ही धडक इतकी भीषण होती की यामध्ये दोघांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. अपघाताची तीव्रता पाहून घटनास्थळावरील नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेत ८ जण गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

# आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण व स्वानंद सार्वजनिक वाचनालयात विविध स्पर्धा व जागतिक सहकार दिन संपन्न

**केज/प्रतिनिधी :** आनंद ग्रामिण विकास प्रतिष्ठाण, आनंदगांव ता. केज जि. बीड व स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड यांचा संयुक्त विद्यमाने काव्यवाचन स्पर्धा, उत्स्फुर्त भाषण स्पर्धा व जागतिक सहकार दिनानिमित्त सहकार परिषद घेवून जागतिक सहकार दिनही साजरा करण्यात आला.

दिनांक ५ जुलै २०२६ रोजी स्वानंद सार्वजनिक वाचनालयाच्या वाचनकक्षात शालेय विद्यार्थांसाठी काव्यवाचन स्पर्धा व उत्स्फुर्त भाषण स्पर्धा हि खुल्या गटात घेण्यात आली. काव्यवाचन स्पर्धेत प्रथम -यशवंत सौदागर तर द्वितीय सोहम गायकवाड यांनी प्राविण्य मिळविले. उत्स्फुर्त भाषण स्पर्धेत प्रथम - सोहम गायकवाड तर द्वितीय - आनंद गायकवाड यांनी प्राविण्य मिळविले.

दोन्ही स्पर्धेचे परिक्षक म्हणून ज्ञानेश्वर गायकवाड व शिवाजी सौदागर यांनी काम पाहिले.



विजयी स्पर्धकांना दोन्ही संस्थेचे संस्थापक, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड, परिक्षक ज्ञानेश्वर गायकवाड, शिवाजी सौदागर, संभाजी लवटे यांच्या हस्ते सन्मानपत्र देवून विजयी स्पर्धकांना सन्मानीत करण्यात आले.

स्पर्धकांनी स्पर्धेच्या युगात जिद्द, चिकाटी, मेहनत आणि सातत्यपूर्वक प्रयत्न करण्याचे अवाहन डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले. दिनांक ३ जुलै २०२६ रोजी जागतिक सहकार दिन सहकार परिषद घेऊन साजरा करण्यात आला.

एकमेका साह्य करू, अवघा धरु सुपंथ या न्यायाने या सहकार परिषदेत सहकाराचे महत्व विषद करण्यात आले. अध्यक्षस्थानी डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच रामराजे गायकवाड, रावसाहेब जाधव, कमलाकर साबळे, जनार्धन गायकवाड, ज्ञानेश्वर गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, एम. आय.टी. पुणेचे गोविंद गायकवाड, नारायणभाऊ गायकवाड, रविंद्र गायकवाड, एस. के. वैरागे यांनी मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोप डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला. सहकार हिच खरी विकासाची व समृद्धीची गुरुकिल्ली असल्याचे प्रतिपादन डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले. आपल्या ग्रामीण भागातही सहकाराचे जाळे विणलेले आहे. जसे कि साखर कारखाने, सुतगिरण्या, पतसंस्था, ग्रहनिर्माण संस्था, ग्राहक भांडारे, सहकारी बँका, आगदी गांवागांवातून सुरु असलेली महिलांचे स्वयंसहाय्यता समुह( बचत गट ), शेतकरी समुह गट, अगदी दूध डेअरी, सेवा सहकारी सोसायटी हि साधारणतः आपल्या भागात असलेली सहकारातील संस्था आहेत.

या विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून शेतकरी - कष्टकरी, मजूर, नोकरदार, माहिला, लघु उद्योजक, सुरीक्षीत बेरोजगारांना रोजगार मिळण्यासाठी छोट्या - मोठ्या प्रमाणात मदत होत आलेली आहे.सहकारातून समृद्धी व शास्वत विकास होण्यास कमी - अधिक प्रमाणात हातभार लागलेला आहे.

विना सहकार नाही उध्दार हे ब्रीद वाक्य घेवून जागतिक पातळीपासून गांवपातळीपर्यंत सहकार चळवळ काम करत आहे.

थोडक्यात समाजातील सर्व थरातील लोकांना सहकार चळवळीचा कमी अधिक प्रमाणात लाभ मिळालेला आहे. म्हणूनच विना सहकार, नाही उध्दार असे प्रतिपादन डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले. दोन्ही कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन दोन्ही संस्थेचे विस्वस्थ आनंद गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# प्रभागातील विकास कामांना मिळणार गती : स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले

## स्थायी समितीच्या निर्णयाने नगरसेवकांना मिळणार निधी, मुंबई नंतर लातूर महापालिकेचा निर्णय



**लातूर/प्रतिनिधी :** प्रभागातील जनतेच्या हितासाठी आवश्यक असणारी विकास कामे करण्यासाठी प्रत्यके सदस्यांना हक्काचा विकास निधी देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याचे सांगून या निर्णयामुळे प्रभागातील विकास कामांना गती मिळणार आहे अशी माहिती स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी दिली आहे. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सुचने नुसार हा निर्णय घेण्यात आला असून मुंबई महापालीकेच्या धर्तीवर असा निर्णय घेणारी लातूर शहर महानगरपालिका राज्यात दुसरी असल्याचे सचिन बंडापल्ले यांनी यावेळी सांगीतले.

महानगर पालिकेच्या स्थायी समितीची बैठक आज सभापती सचिन बंडापल्ले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. याबैठकीत विविध सहा विषयांवर विचार विनिमय करुन निर्णय घेण्यात आला. यामध्ये सर्वात महत्वाचा निर्णय म्हणजे प्रभागातील विकास कामांना गती देण्याबाबत घेण्यात आला. जनतेच्या हितासाठी आपापल्या प्रभागातील जी विकास कामे सुचवली आहेत. ती विकास कामे पूर्ण होण्याकरीता नगरसेवकांना प्रत्येकी १२ लक्ष ५० हजार रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे नगरसेवकांना आता विकास कामे पूर्ण करण्यात कोणतीच अडचण येणार नसुन यामाध्यमातून लातूरकरांना दिलासा मिळणार आहे.

या विषयासोबतच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७५ फुटी पुतळा उभारणी बाबत विचार विनिमय करुन सदर पुतळा कसा असावा व परिसराचे सुशोभिकरण कसे असावे याकरीता सदस्यांचा हैद्राबाद येथे अभ्यासदौरा करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

याबैठकीत मनपाचे पदाधिकारी व अधिकारी यांना वाहन पुरवठा करणे यासह सामान्य प्रशासन विभागात मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे आणि विविध कामांबाबत अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा होऊन बैठक पार पडली. तत्पूर्वी सदस्यांनी ज्या विविध सुचना केल्या आहेत त्याबाबत संबंधीत विभागांनी आवश्यक असणारी कार्यवाही करावी अशी सुचना सभापती बंडापल्ले यांनी दिली.

या बैठकीस सदस्य अ‍ॅड. दिपक सुळ, रविशंकर जाधव, अहमदखॉं पठाण, स्वाती घोरपडे, अ‍ॅड. मनोज थोरात, विकास कांबळे, गिरीश ब्याळे, ज्योती आवस्कर , निकीता सोमवंशी, अ‍ॅड. अतिष चिकटे, इसरार सगरे, अदिती पाटील कव्हेकर अनंत गायकवाड,बाळासाहेब देशमुख, पवन सोलंकर यांच्यासह आयुक्त राहूल कुलकर्णी, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त वसुधा फड, पंजाब खानसुळे यांच्या सह विविध विभाग प्रमुख व अधिकारी उपस्थित होते.

आर ओ प्लांट साठी नाहरकत प्रमाण पत्र बंधनकारक करावे. शहराच्या विविध भांगांमध्ये शुद्ध पाणी पुरवठ्याच्या नावाखाली अनेक आर ओ प्लांट सुरु आहेत. या पैकी काही प्लांटच्या माध्यमातून अस्वच्छ व अशुध पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी आल्या आहेत, त्यामुळे शहरातील सर्व आर ओ प्लांटची तात्काळ तपासणी करण्याचे आदेश सभापती सचिन बंडापल्ले यांनी दिले आहेत. तसेच या प्लांट साठी मनपाचे ना हरकत प्रमाणपत्र बंधनकारक करण्याच्या सुचनाही देण्यात आल्या आहेत.

या बैठकीच्या वेळी शहरातील व्यवसायीक, खाजगी, निवासी इमारती व शैक्षणिक संकुलामध्ये अग्निशामक प्रतिबंधक यंत्रणा तपासणीचे आदेश यापूर्वीच दिले असल्याने या बाबतचा आढावा अग्निशमन विभागाकडून घेण्यात आला. तसेच याबाबत कोणतीही दिरंगाई होणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सुचना देण्यात आल्या

## मालाड येथील शाळेतील प्रार्थना कार्यक्रम प्रकरणी गुन्हा दाखल – गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

**मुंबई /प्रतिनिधी :** मुंबईतील मालाड पश्चिम येथील रिजॉयस इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या प्रार्थना कार्यक्रमाबाबत प्राप्त तक्रारीची गंभीर दखल घेऊन संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे, अशी माहिती गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

सदस्य अतुल भातखळकर यांनी यासंदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता, त्यास उत्तर देताना ते बोलत होते. डॉ.भोयर यांनी सांगितले की, १० मे २०२६ रोजी मालाड पश्चिम येथील रिजॉयस इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित प्रार्थना कार्यक्रमात एका व्यक्तीने उपस्थितांच्या डोक्यावर हात ठेवून आजार बरे करण्यासह जीवनातील दुःख दूर करण्याबाबत दावे केल्याची तक्रार प्राप्त झाली होती. या तक्रारीनंतर पोलिसांनी चौकशी केली असता, उपस्थितांना धर्मांतर करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा आग्रह करण्यात आल्याचे आढळून आले नाही. तथापि, चौकशीदरम्यान तक्रारदाराला घरामध्ये देवी-देवतांची छायाचित्रे लावू नयेत, असे सांगण्यात आल्याचे निष्पन्न झाले; तसेच संबंधित कार्यक्रमातून अंधश्रद्धेला खतपाणी घालण्याचा प्रकार निदर्शनास आल्याने मालाड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील संबंधित तरतुदींसह महाराष्ट्र नरबळी, इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा आणि जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या प्रकरणातील सर्व बाबींची सखोल चौकशी सुरू असून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल. शाळांमध्ये अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित होऊ नयेत यासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत आवश्यक आदेश निर्गमित करण्याबाबतही कार्यवाही करण्यात येईल, असे डॉ. भोयर यांनी सांगितले.

## महिला सक्षमीकरणासाठी विलासराव देशमुख फाउंडेशनचा पुढाकार; कातपुर येथे मोफत ब्युटी पार्लर प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ



**लातूर/प्रतिनिधी :** विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने कातपुर येथे महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी मोफत ब्युटी पार्लर प्रशिक्षण केंद्र क्र. ३ ची सुरुवात करण्यात आली आहे. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाने आणि ट्वेंटीवन अ‍ॅग्री लि.च्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या पुढाकारातून हे प्रशिक्षण केंद्र चालवण्यात आले होते.

विलासराव देशमुख फाउंडेशनच्या प्रयत्नातून ग्रामीण भागातील महिलांना रोजगाराची संधी मिळावी, या उद्देशाने हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. फाउंडेशन महिलांना मोफत प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे काम करत आहे. या नवीन प्रशिक्षण केंद्रामध्ये एकूण ५६ महिलांनी सहभाग नोंदवला आहे. या प्रशिक्षणात महिलांना ब्युटी पार्लरच्या विविध पद्धती शिकवल्या जाणार आहेत.

संस्थेच्या विभाग प्रमुख संगीता मोळवणे यांच्या शुभहस्ते या केंद्राचे उद्घाटन झाले. यावेळी अविनाश देशमुख, गावचे उपसरपंच मनोज देशमुख, ट्रेनर सलमा पठाण समन्वयक गजानन बोयणे, सोशल प्लॅनर सोमनाथ कावळे आणि गावातील मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

## चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्र परिसरातील पायाभूत सुविधांचे नूतनीकरण करण्याबरोबरच डीपीआर तयार करण्यात येणार : मुख्यमंत्री





**मुंबई/प्रतिनिधी :** चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राच्या भटाडी खाणीतून कोळसा वाहतूक करणाऱ्या 'पाईप कन्व्हेअर बेल्ट'सह परिसरातील जुन्या पायाभूत सुविधांचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत आज दिली.

सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भटाडी खाणीतून कोळसा वाहतूक करणाऱ्या पाईप कन्व्हेअर बेल्ट परिसरात ५ मे २०२६ रोजी आग लागण्याची घटना घडली होती. ही आग कन्व्हेअर बेल्टच्या लोडिंग अथवा अनलोडिंग भागात लागलेली नव्हती. कन्व्हेअर बेल्ट ज्या भागातून जातो, त्या परिसरात अनेक शेतकऱ्यांची शेती आहे. शेतातील अवशेष जाळल्यामुळे लागलेल्या आगीचा परिणाम कन्व्हेअर बेल्ट परिसरावर झाला आणि त्यातून ही घटना घडली. या घटनेत कोणतेही नुकसान झाले नसून आग तातडीने नियंत्रणात आणण्यात यश आले होते. आपत्कालीन प्रतिसाद पथकही अपेक्षित वेळेत घटनास्थळी पोहोचल्यामुळे परिस्थितीवर वेळीच नियंत्रण मिळविणे शक्य झाले.

सदर प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्या परिसरातील नागरिकांमध्ये गवत व पीक अवशेष उघड्यावर न जाळण्याबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून आवश्यकतेनुसार जनजागृती करण्यात येईल. त्याचबरोबर जुन्या झालेल्या पायाभूत सुविधा व यंत्रणांचे नूतनीकरण करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी डीपीआर तयार करून टप्प्याटप्प्याने नूतनीकरणाची कामे हाती घेण्यात येतील, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## राज्यातील खाजगी शिकवणी व सावकारी तात्काळ बंद करावी : संजयभाऊ कांबळे




**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील खाजगी शिकवणी वर्ग आणि खाजगी फायनान्स व सावकारी तात्काळ बंद करण्यात यावेत,अशी मागणी भारतीय दलित पँथरचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे यांनी एका लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. तत्पूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शनेही करण्यात आली. लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनात संजयभाऊ कांबळे यांनी पुढे असे नमूद केले आहे की, नीट पेपर फुटी प्रकरणाने देशभरात खळब माजली आहे. अकरावी - बारावीचे शिक्षण हे केवळ अनुदानापुरते मर्यादित राहिले आहे. कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक पद्धत नसल्याने सर्व महाविद्यालयातीलप्राध्यापकाच्या संमतीने सर्व विद्यार्थी खाजगी क्लासेस मध्ये मोठ्या प्रमाणात फीस भरून शिक्षण घेत आहेत. गरिबांच्या विद्यार्थ्यांना फीस भरून खाजगी कोचिंग क्लासेस मध्ये शिक्षण घेणे परवडत नसल्याने आणि महाविद्यालयात प्राध्यापक शिकवत नसल्याने गरिबांचे शिक्षण राहिलेच नाही, ही बाब गंभीर असून शासनाने याची तात्काळ दखल घेऊन महाराष्ट्रातील सर्व खाजगी कोचिंग क्लासेस बंद करावेत आणि महाविद्यालयातील अकरावी बारावीचे शिक्षण प्रत्यक्षात कॉलेजमध्ये घेण्याचे सक्तीचे करून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक पद्धत अवलंब करण्याचे आदेश द्यावेत.

तसेच लातूर जिल्ह्यातील नणंद गावच्या शेतकऱ्यांची सावकारांनी मोठ्या प्रमाणात पिळवणूक केल्याचे उघड झाले असून असे अनेक प्रकार लातूर जिल्ह्यात घडले आहेत व दैनंदिन घडत आहेत. फायनान्सवाले आणि खाजगी सावकार यांच्या दहशतीमुळे पुढे येण्यास कोणी धजत नसून त्यांनी लातूर जिल्ह्यामध्ये दहशत निर्माण केली आहे. ग्रामीण व शहरी भागातील मजबूर लोकांचा फायदा घेऊन त्यांचा मोठ्या प्रमाणात पिळवणूक करीत आहेत. त्यांची प्रचंड दहशत असल्याने लोक समोर येण्यास तयार नाहीत, मात्र आत्महत्या करण्यास तयार असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे लातूर जिल्ह्यातील १२ शासकीय धान्य गोदामामध्ये हमाली करणाऱ्या हमालांचे बनावट रेकॉर्ड तयार करून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार करणाऱ्या संबंधित कंत्राटदाराची एसआयटीमार्फत चौकशी करून त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी,अशी मागणी त्यांनी केली आहे.

यावेळी संजयभाऊ कांबळे यांच्यासह धम्मानंद घोडके, संग्राम कदम, सतीश मादळे, नितीन कांबळे, राजू कांबळे दावणगावकर, सायस पाडुळे, केतन कांबळे, प्रकाश सूर्यवंशी, रमेश पाडुळे, राम सावते, दिलीप साबळे, सुभाष हलसुरे, बब्रुवान भालेराव, देवानंद चिकाटे, प्रकाश सूर्यवंशी, अंकुश पाडुळे, कमलाकर साबळे, आत्माराम हलसुरे यांची उपस्थिती होती.

## ठाणे जिल्ह्यात जात प्राणपत्राच्या लाचप्रकरणी संबंधित उपसंचालक निलंबित

### विभागीय चौकशीसह जात वैधता प्रमाणपत्रांचीही सखोल पडताळणी होणार – आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक वुईके

**मुंबई/प्रतिनिधी :** ठाणे जिल्ह्यातील चरई येथील एमटीएनएल इमारतीमध्ये कार्यरत आदिवासी विकास विभागाच्या उपसंचालक (संशोधन), वर्ग-१ कार्यालयातील लाचप्रकरणी संबंधित अधिकाऱ्याला तत्काळ निलंबित करण्यात आले आहे. सचिवांच्या मान्यतेने त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशीसाठी आरोपपत्र दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याची माहिती आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी विधानसभेत दिली.



विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात सदस्य राजू तोडसाम यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री डॉ. वुईके बोलत होते. यावेळी सदस्य धर्मराव आत्राम यांनीही चर्चेत सहभाग घेतला.

मंत्री डॉ. वुईके यांनी सांगितले की, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या प्रकरणांतील नस्तीची पूर्तता करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्याने लाचेची मागणी केल्याची तक्रार १३ फेब्रुवारी २०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त झाली होती. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीच्या पथकाने चरई येथील कार्यालयात सापळा रचून संबंधित उपसंचालकाला २ लाख ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना पंचांसमक्ष अटक केली.

या घटनेनंतर संबंधित अधिकाऱ्याला तत्काळ निलंबित करण्यात आले आहे. सचिवांच्या मान्यतेने त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशीसाठी आरोपपत्र दाखल करण्यात येणार आहे. न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतर नियमानुसार पुढील प्रशासकीय कारवाई करण्यात येईल; तसेच संबंधित अधिकाऱ्याने यापूर्वी जारी केलेल्या जात पडताळणी व जात वैधता प्रमाणपत्रांचीही सखोल चौकशी करण्यात येणार आहे. त्यामध्ये कोणतीही अनियमितता आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असेही मंत्री डॉ. वुईके यांनी सांगितले.

## पालकांनी मुलांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात जायला प्रोत्साहित करावे- पाटील

**लातूर/प्रतिनिधी :** आजच्या काळात पालकांनी संपत्ती जपण्यापेक्षा संतती जपण्यास प्राधान्य देणे आवश्यक बनले आहे. आपल्या मुलांवर चांगले संस्कार करावेत.संस्कार हे पुस्तकात मिळत नाहीत तर कुटुंबात मिळतात. मुलांना आपल्या आवडीप्रमाणे नव्हे तर त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात जायला प्रोत्साहित करावे तरच त्यांचे भवितव्य उज्वल घडेल असा विश्वास राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केला.




श्री केशवराज शैक्षणिक संकुलाच्या वतीने दि.६/७/२०२६ रोजी दयानंद सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या गुणवंतांचा गुणगौरव सोहळा कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख हे होते.प्रमुख मार्गदर्शक म्हणून लातूरच्या अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती शिल्पाताई करमरकर ह्या मंचावर उपस्थित होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून छत्रपती संभाजीनगरचे प्रसिद्ध उद्योजक विवेक देशपांडे यांची उपस्थिती होती.

यावेळी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, अविनाश तळणीकर, केंद्रीय विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे, श्री केशवराज शैक्षणिक संकुलचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, शालेय समितीचे अध्यक्ष (माध्य.) गंगाधर खेडकर, रेनिसन्स सीबीएसई स्कूल अध्यक्ष प्रा.कृष्णा जाधव, केशव शिशुवाटिका अध्यक्षा वर्षा डोईफोडे, मुख्याध्यापक (माध्यमिक) शैलेंद्र कंगळे, मुख्याध्यापक (प्राथमिक) शिवाजी हेंडगे,रेनिसन्स सीबीएसईच्या प्राचार्या सोनाली दर्डा, शिशुवाटिका प्रधानाचार्या अवंती कुलकर्णी आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती. यावेळी बाबासाहेब पाटील आणि इतर मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह सत्कार करण्यात आला.

आपल्या मार्गदर्शनात बाबासाहेब पाटील यांनी जीवनात आज विद्यार्थी,आई, वडील यांच्यातील सुसंवादाची कमतरता झाल्याचे सांगितले. पालकांनी मुलांना हिणवण्याऐवजी त्यांचे कौतुक करावे. त्यांना प्रोत्साहन द्यावे.मुलांना त्यांच्या बुद्ध्यांकाप्रमाणे शिकू द्या. प्रत्येकाने आपल्या कामाला न्याय दिल्यास त्यासारखा दुसरा आनंद नसतो. आपल्याला सहकार मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. आपण या क्षेत्रासाठी जेवढे चांगले करता येईल तेवढे करत आहोत. चांगल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांप्रमाणे आदर्श शेतकरी घडला पाहिजे यासाठी प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रमुख मार्गदर्शक शिल्पाताई करमरकर यांनी आपल्या मार्गदर्शनात श्री केशवराज विद्यालयाने दिलेल्या मजबूत वैचारिक पायामुळेच आपण जीवनात यशस्वी होऊ शकल्याचे सांगितले. या शिक्षण संस्थेत शिक्षण घेतलेला एकही विद्यार्थी आयुष्यात असफल होत नाही.एवढी तात्विक मजबुती येथील शिक्षकवृंद विद्यार्थ्यांना प्रदान करतात,असेही त्यांनी गौरवाने नमूद केले. विवेक देशपांडे यांनीही आपल्या मनोगतात या संस्थेत शिकल्यामुळेच जीवनात यशस्वी होऊ शकलो, या संस्थेच्या लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयातील कठोर शिस्तीने जीवन घडवल्याचे सांगितले.

अध्यक्षीय समारोप प्रवीण सरदेशमुख यांनी केला.त्यामध्ये त्यांनी पालकांना मुलांकडून खूप अपेक्षा असतात, त्याप्रमाणे नक्कीच घडत असते असे सांगितले.विद्यार्थ्यांनी आयुष्यात आपले ध्येय छोटे ठेवू नये असेही त्यांनी आग्रहाने नमूद केले. त्याचप्रमाणे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या प्रगतीची वाटचालही त्यांनी थोडक्यात सांगितली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेश कस्तुरे यांनी केले.प्रास्ताविकात त्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागची पार्श्वभूमी सविस्तरपणे विशद केली. श्रीमती कांचन तोडकर यांनी सरस्वती स्तवन प्रस्तुत केले. गुणवंत विद्यार्थ्यांच्या वतीने आदित्य गरड, कु.अमृता गोस्वामी,कृष्णा कच्छवे, कु.वेदिका मामडगे यांनी मनोगत व्यक्त केले. संतोष बीडकर यांनी वैयक्तिक गीत सादर केले.गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन श्रीमती अर्चना ठोंबरे व लक्ष्मण गिराम यांनी केले. दहावी प्रमुख अर्चना ठोंबरे, सहप्रमुख लक्ष्मण गिराम, सीबीएसई विभागातील दहावी प्रमुख विनोद जाधव यांचा या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जितेंद्र जोशी,शैला सांगवीकर यांनी तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक शिवाजी हेंडगे यांनी केले. सामूहिक कल्याणमंत्राने या कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर,अंजली निर्मळे,धनंजय कुलकर्णी, राम जोशी, श्री केशवराज कनिष्ठ महाविद्यालय विभाग प्रमुख रेखा पुरी, गुरूनाथ झुंजारे,राहूल गायकवाड, तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.